# जीवनपट...



## शिक्षणमहर्षी तथा कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख

- २७ डिसेंबर, १८९८ जन्म-पापळ, जि. अमरावती. कदम घराणे, वडील शामराव बापू व आई राधाबाई.
- १९०६-१९११ प्राथमिक शिक्षण- वर्ग १ ते ३ प्राथमिक शाळा, पापळ. वर्ग ४ था चांदुर रेल्वे.
- १९११-१९१८ माध्यमिक शिक्षण कारंजा लाड व हिंदू हायस्कूल, अमरावती (सध्याचे ॲकेडेमिक हायस्कूल)
- १९१८-१९२० महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेज, पुणे
- २१ ऑगस्ट, १९२० उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला प्रयाण.
- २१ सप्टेंबर, १९२० केंब्रिज विद्यापीठात प्रवेश.
- ऑक्टोबर, १९२० बॅरीस्टरची पहिली परीक्षा पास.
- ८ डिसेंबर, १९२० बॅरीस्टरची दुसरी परीक्षा प्रथम श्रेणीत पास.
- ऑक्टोबर, १९२१ एम.ए. ऑनर्ससाठी प्रवेश. व्हॅन्स डनलॉप संस्कृत रिसर्च स्कॉलरशिप मिळाल्याबद्दल इंग्लंडच्या वृत्तपत्रात गौरव.
- १९ जून, १९२३ एडींबरो विद्यापीठात संस्कृत विषयात एम.ए. (ऑनर्स)
- १५ जाने., १९२५ ग्रेट ब्रिटनचे पंतप्रधान लॉर्ड ऑस्टीक नथ यांचे हस्ते लिंकन-इन मधे बार-ॲट-लॉ ची पदवी. वयाच्या २७ व्या वर्षी ऑक्सफर्ड विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे महापंडित हा जगातील अत्युच्य गौरव मिळविला.
- २५ जाने. १९२५ 'वेद वाङ्मयातील धर्माचा उगम आणि विकास' या शोधप्रबंधावर डी.फील. पदवी.
- १५ जुलै, १९२६ मायदेशी परत.
  १) अमरावतीला वकिली सुरू केली.
  २) गुलाबराव शिसोदे नायगावकरांच्या 'सत्यशोधक जलसाचा' फौजदारी खटला चालविला आणि जिंकला.
  ३) बेरार मराठा शिक्षण समाजाच्या श्री शिवाजी मराठा हायस्कूलच्या मॅट्रीकच्या वर्गास निर्वेतन शिक्षक म्हणून कार्य.
- विजयादशमी १९२६ श्री शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळाची स्थापना.
- डिसेंबर, १९२६ १) श्रद्धानंद वसतिगृहाची स्थापना.
  २) 'महाराष्ट्र केसरी' वृत्तपत्र सुरु केले.
  ३) मोर्शीच्या 'हिंदु महासभा' अधिवेशनात चार्तुवर्णाविरुद्ध भाषण.
- ऑगस्ट, १९२७ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यता निवारण परिषद.
  अमरावतीचे अंबादेवी मंदिर हरिजनांसाठी खुले करण्यासाठी चळवळ व नेतृत्व. अंबादेवी संस्थानच्या विश्वस्तांशी याबाबत वाटाघाटी.
- २६ नोव्हेंबर, १९२७ मुंबईच्या प्रार्थना समाजात सत्यशोधक पद्धतीने कु. विमल वैद्य, मुंबई या सुविद्ध युवतीशी आंतरजातीय विवाह.
- ऑगस्ट, १९२८ १) वऱ्हाड शेतकरी संघाची स्थापना.
  २) अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष.
  ३) आसरा, अमरावती, इटकी व दर्यापूर पाणिपुरवठा योजना अविरोध मंजूर केली
- ७ नोव्हेंबर, १९२८ १) शैक्षणिक विकासार्थ शिक्षण करात १८ पै. वरुन २७ पै. वाढ.
  २) ११ वर्षांखालील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.
  ३) सार्वजनिक धर्मशाळा, मंदिरे, पाणवठे व सभागृहे अस्पृश्यांसाठी खुली केली.
  ४) बस्तर संस्थानात धमतेरी येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या
- ९ एप्रिल, १९३० महारांच्या मुलांची वडिलांचे पितर म्हणून पूजा.
- मे, १९३० खादी प्रसारासाठी जिल्हाभर यात्रा. महात्मा गांधीसोबत हरिजन फंडासाठी स्वत:च्या मोटारीतून दौरा.
- १४ डिसेंबर, १९३० १) मध्यप्रांत वऱ्हाडच्या राज्यव्यवस्थेत शिक्षण, शेती, लोककर्म व सहकार खात्याचे मंत्री.
  २) मध्यप्रदेश, वऱ्हाडसाठी प्राथमिक शिक्षण कायदा दुरुस्त करणारे बील मांडले.
  ३) शेतकऱ्यांच्या मुलांना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षणात ३४ टक्के सवलत मिळवून दिली.
- १९३१ मध्यप्रदेश प्रांतिक कायदेमंडळावर निवड.
- १ जुलै, १९३२ १) श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना व नोंदणी.
  २) मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळासमोर मार्केट बिल सादर केले.
  ३) मध्यप्रांत- वऱ्हाडच्या कायदे कौन्सिलसमोर हिंदू देवस्थान बिल आणले.
- २५ ऑगस्ट, १९३२ कर्जलवाद विधेयक पारीत झाले. शेतकऱ्यांच्या ऋणमुक्तीच्या कायद्यामुळे शेतकऱ्यांची ९०% शेती वाचली.
- १९३३ जातीयवादी बंधने नकोत म्हणून मंत्रीपदाचा राजीनामा दिला तथापी १९३७ पर्यंत प्रांतिक कायदेमंडळाचे सदस्य.
- १९३५ १) अमरावती कापूस बाजार समितीचे अध्यक्षपद भुषविले.
  २) कोल्हापुरचे राजाराम महाराज, हैद्राबादचे निजाम यांच्याशी शिक्षण प्रसाराचे दृष्टीने संपर्क व त्यांचे आर्थिक सहकार्य.
- फेब्रुवारी, १९३८ भारत सेवक दलाची स्थापना.
- १९३९ अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे २६ वे अमरावती येथील अधिवेशनात सडेतोड विचार मांडले.
- १९४१ श्री शिवाजी शिक्षण संस्था अत्यंत आर्थिक अडचणीत असताना स्वत:चा राहता बंगला गहाण ठेवून संस्थेसाठी २० हजार रुपयांचे कर्ज काढले.
- १९४२-१९४४ देवासच्या संस्थानचे राजकीय मंत्री व ''मध्य भारत व अन्य संस्थानांचे संघटन'' या संस्थेत प्रमुख सल्लागार, देवास राज्यसभेचे उपाध्यक्ष व मिनिस्टर्स कौन्सिलचे सभासद.
- १९४४ १) आझाद हिंद सेनेचा खटला चालविला.
  २) कर्नाटकात हौदागीरीला छत्रपती शिवरायाच्या जन्मदात्याच्या समाधीची अवहेलना पाहून ढसाढसा रडले. तेथील जिल्हाधिकाऱ्याला बोलावून स्वत:च्या खात्यातून १ हजार रुपयाचा चेक देवून समाधीची व्यवस्था करण्यास सांगितले.
- १९४६ घटना समितीमध्ये निवडून आले. घटना समितीत सक्रीय सहभाग. समारोपाच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुक्तकंठाने गौरव केला.
- १२ नोव्हेंबर, १९४६ सातारचे स्वातंत्र्यवीर ग्रामराज्य संस्थापक क्रांतिसिंह नाना पाटील यांचा सत्कार दौरा वऱ्हाडात आयोजित केला.
  अमरावती जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष.
- १ ऑक्टोबर, १९४७ अमरावतीला 'संदेश' नावाचे साप्ताहिक सुरू केले.
- १९४८ १) नागपूर विश्वविद्यालयाचे सभासद, विद्यापीठातर्फे एलएल.डी. पदवी प्रदान.
  २) वाशिंग्टन येथे भरलेल्या जागतिक अन्न व कृषी संघटनेच्या अधिवेशनात भारताचे प्रतिनिधित्व केले.
- २९ जानेवारी, १९५० मा. डॉ. राजेंद्र प्रसाद राष्ट्रपती भारत सरकार यांचे हस्ते 'शिवाजी लोकविद्यापीठाचे' उद्घाटन.

- १९५० लंडनच्या रॉयल सोसायटी ऑफ आर्टसने सदस्यत्वाचा (fellowship) बहुमान दिला.
- १९५१ रोम येथे जागतिक अन्न व कृषी संघटनेच्या सातव्या अधिवेशनात भारताचे प्रतिनिधित्व.
- १७ एप्रिल, १९५२ लोकसभेच्या निवडणुकीत संपूर्ण भारतात दुसऱ्या क्रमांकावर मते प्राप्त केली.
- १९५२ भारताचे पहिले कृषिमंत्री. अभिनव भातशेती जपान पद्धतीचा देशव्यापी अवलंब व प्रसार.
- १९५३ अखिल भारतीय मधुमक्षिका पालन संघटनेची स्थापना व संघटनेचे अध्यक्ष.
- १९५४ सिलोनला जागतिक अन्न व कृषी परिषदेसाठी भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे नेते.
- ५ जानेवारी, १९५४ अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे नागपूर अधिवेशनाचे अध्यक्ष. (उद्घाटक– मा. पंडित नेहरु)
  अखिल भारतीय अविकसित समाज संघटना संस्थापक अध्यक्ष (All India Backword Classes Fedration)
- १९५४–५५ डेहराडून येथे चतुर्थ वन कॉंग्रेसचे अध्यक्ष.
- १९५५ पुणे कार्पोरेशनने भारताचे कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुखांना मानपत्र दिले. याप्रसंगी त्यांनी विदर्भासहित संयुक्त महाराष्ट्राची घोषणा केली.
- ७ फेब्रुवारी, १९५५ स्वत: डॉ. पंजाबराव देशमुखांनी भारत कृषक समाजाची घटना तयार करून पंजिबद्ध केली.
  भारत कृषक समाजाचे संस्थापक अध्यक्ष.
- १९५५ १) 'असंख्यांकरिता अन्न' या संस्थेची स्थापना व संस्थापक अध्यक्ष.
  २) अखिल भारतीय ताडगुळ महासंघाचे अध्यक्ष.
- १९५६ १) युवक कृषक समाजाची स्थापना.
  २) कृषी सहाय्यक यंत्र संघटना संस्थापक
  ३) कलकत्ता येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय अन्न व कृषी संघटनेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष.
  ४) अखिल भारतीय अखाद्य तेल बीज उद्योग संघटना, कुक्कुटपालन संस्था, गाई– म्हशीसाठी कृत्रिम रेतन केंद्राचा पाठपुरावा.
- १९५७–१९५८ भारताचे सहकार मंत्री.
- २ ऑक्टोबर, १९५८ राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी–विक्री संघ संस्थापक अध्यक्ष.
- १९५८ १) एफ.ए. ओ. परिषदेला हिंदी प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व.
  २) जपानला भेट.
  ३) श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्य महोत्सवाचे उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे हस्ते उद्घाटन.
  ४) श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती हे भारतातील पहिले खाजगी कृषी महाविद्यालय स्थापन केले.
- १९५८–१९५९ १) भारतीय कृषक सहकारी अधिकोषाची स्थापना.
- ५ ऑक्टोबर, १९५९ अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणे येथे पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते शाहू मंदिराचा कोनशिला समारंभ. स्वागताध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख.
- १९५९–१९६० जागतिक शेतकी प्रदर्शनाचे दिल्ली येथे आयोजन.
  (अध्यक्ष आयसेन व्हाओर, डॉ. राजेंद्र प्रसाद, पं. जवाहरलाल नेहरु द्वारा मुक्त कंठाने गौरव)
- १९६० १) भारत कृषक सहकारी पतपेढी संस्थापक अध्यक्ष.
  २) भारतीय घटक राज्यातील शेतकी मंत्र्यांच्या मंडळाचे नेते म्हणून रशियास प्रयाण. एका वर्षात सात महाविद्यालये स्थापण्याचा जागतिक विक्रम केला.
  ३) जागतिक कृषी प्रदर्शनीला रशियाचे अध्यक्ष नोरोशिलॉव्ह प्रधानमंत्री ख्रुश्चेव्ह, जर्मनीचे उपप्रधानमंत्री व कृषिमंत्री, पोलंड, नेपाळ व कंबोडीया या देशाचे पंतप्रधान, लेडीमाऊंट बॅटन, फील्ड मार्शल मॉंटगोमरी यांनी भेटी दिल्या.
  ४) आफ्रोआशियन, ग्रामीण पुनर्रचना संघटनेचे दुसरे अधिवेशन दिल्ली येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली. अमेरिकेच्या राष्ट्रीय कृषी संघटनेने आजीव सदस्यत्व बहाल केले. संघटनेच्या डेनव्हर मोलोरॅडो मुख्य कार्यालयात डॉ. पंजाबराव देशमुखांचे नाव पितळी फलकावर कोरून लावले आहे.
  ५) पंतनगर येथे पहिले कृषी विद्यापीठ स्थापन केले.
- २७ डिसेंबर, १९६० १) महाराष्ट्राचे तत्कालीन लोकप्रिय मुख्यमंत्री ना. यशवंतरावजी चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली हीरक महोत्सवाचा नेत्रदीपक सोहळा. हीरक महोत्सव निधी श्री शिवाजी शिक्षण संस्थेला अर्पण केला.
  २) नागपुरला धनवटे रंगमंदिरात डॉ. पंजाबरावांचा हीरक महोत्सव.
  ३) नवी दिल्ली येथील नॉर्थ अॅव्हेन्यु क्लबमध्ये डॉ. पंजाबरावांचा हीरक महोत्सव.
  ४) कोल्हापूर येथे केशवराव भोसले नाट्यगृहात डॉ. पंजाबरावांचा हीरक महोत्सव
  ५) म्हैसुरचे राजे चामराज वड्डीयार यांच्या सामा पॅलेसमध्ये डॉ. पंजाबरावांचे तैलचित्र लावले.
  ६) खानदेशात जळगाव जिल्ह्याच्या वतीने ६३०० रु. ची थैली अर्पण.
- १९६१ १) प्रथम राष्ट्रीय कृषी प्रदर्शन कलकत्ता. या प्रदर्शनीचे उद्घाटन मा. उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी केले. इंग्लंडच्या एलीझाबेथ राणीसाहेब व त्यांचे पती प्रिन्स फीलीप ड्युक ऑफ एडिनबर्ग यांनी हे प्रदर्शन यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख यांचे अभिनंदन केले.
  २) आंतरराष्ट्रीय ग्रामीण युवक परिषदेचे अध्यक्ष आफ्रो–एशियन ग्रामीण पुनर्संघटन परिषदेची स्थापना, दिल्ली व कैरो अधिवेशनाचे अध्यक्ष.
- १९६२ द्वितीय राष्ट्रीय कृषी प्रदर्शनी, मद्रास १६ लाख लोकांनी हे प्रदर्शन पाहिले.
- १९६३ १) डॉ. पंजाबराव देशमुखांची इफाप (International Federation of Agriculture producers-IFAP) या आंतरराष्ट्रीय उत्पादक संघाच्या अध्यक्षपदी अविरोध निवड.
  २) नार्वे व स्वीडन येथे आठ दिवस माश्यांची अनेक प्रकारची माहिती करून घेऊन मत्स बिजोत्पादन व त्यांचे वितरण या कामाला प्रोत्साहन दिले.
  ३) लंडनमध्ये छत्रपती शिवाजी एज्युकेशन ट्रस्टची स्थापना.
- १९६३–१९६४ भारत कृषक समाजाच्या कार्यासाठी न्युझिलंडचा दौरा.
- १० एप्रिल, १९६५ रामनवमीच्या रात्री ११.३० वा. दिल्ली येथील विलिंग्डन हॉस्पीटलमध्ये देहावसान.
- ११ एप्रिल, १९६५ दिल्ली येथे निगमबोध घाटावर अंत्यसंस्कार.
- १२ एप्रिल, १९६५ लोकसभेची कृतज्ञ श्रद्धांजली.
- १९६८ नागपूर अधिवेशनात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे बील पारित.
- १४ जाने., १९७४ डॉ. भाऊसाहेबांच्या भव्य ताम्र पुतळ्याचे अमरावतीच्या शिवाजी नगरात उपराष्ट्रपती मा. बी. डी. जत्ती यांच्या हस्ते अनावरण.
- २७ डिसें., १९९७ जन्मशताब्दी सोहळा आरंभ
- २७ डिसें., १९९८ जन्मशताब्दी सोहळा सांगता समारोह
- ५ डिसें., २००६ डॉ. भाऊसाहेबांच्या तैलचित्राचे संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात
  महामहीम उपराष्ट्रपती, भैरोसिंग शेखावत यांचे हस्ते अनावरण.